# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट क्र-४३** **दिनांक - १३/०२/२०२४**

## वाहन चोरी करणा-या सराईत गुन्हेगारांकडुन ३ गुन्हयांची उकल करण्यात गुन्हे शाखा कक्ष- २ वसई यांना यश

नायगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि नं I ८०/२०२४ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे या गुन्हयातील फिर्यादी सौ.श्रृती शशिकांत भोसले, वय ३८ वर्षे, व्यवसाय : गृहिणी, राहणार रुम नं.५०८ एच-विंग ग्लोबल अरेना सनटेक नायगाव पुर्व, तालुका वसई, ता. वसई, जिल्हा पालघर यांची दिनांक.०९/०२/२०२४ रोजी सकाळी ०९.४५ वा.ते सायंकाळी ०७.०० वा.चे दरम्यान नायगाव रेल्वे स्टेशन ब्रीजच्या रस्त्यावर, नायगाव पुर्व येथे सार्वजनिक रोडच्या कडेला उभी केलेली २०,०००/- रुपये किंमतीची होन्डा कंपनीची लाल रंगाची ॲक्टीव्हा ३ जी क्रमांक:एम-एच-०४-एच.एच-८३५७ ही कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने उघडयावरुन चोरून नेल्याबाबत फिर्यादी यांनी नायगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरुन दि.१०/०२/२०२४ रोजी १४.०७ वा. सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे हद्दिमध्ये सतत होणा-या वाहन चोरींचे प्रमाण वाढत असल्याने सदर वाहन चो-यांवर आळा घालणेबाबत मा. वरीष्ठांनी ओदशित केले होते. त्या अनुषंगाने घडणा-या प्रत्येक वाहन चोरीच्या गुन्हयाचे ठिकाणी प्रत्यक्ष भेट देवून घटनास्थळावरील सी सी टी व्ही फुटेजचे परीक्षण गुन्हे शाखा कक्ष -२ वसई यांचे मार्फतीने करण्यात येत होते. त्याप्रमाणे नायगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि नं I ८०/२०२४ भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे या गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवून घनास्थळाचे आजूबाजूच परीसराचे सी सी टी व्ही कॅमेरांचे फुटेज पडताळुन सदर चोरीची मोटार स्कुटी ही चालवून नेणा-या दोन अनोळखी चोरटयांचे सी सी टी व्ही फुटेज प्राप्त करण्यात आले. प्राप्त फुटेजचा माग काढुन फुटेज मधील अनोळखी चोरटयांचे नावाची गुप्त बातमीदाराकरवी उकल करुन आरोपीत व्यक्तींना सापळा रचुन ताब्यात घेण्यात आले.

**ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीताचे नाव पत्ता :-**

१) राहुल सुर्यकांत दळवी वय २७ वर्ष रा. श्रीप्रस्था ओमसाई हाईट्स, फेज-२, रुम नं ७०१, नालासोपारा पश्चिम
२) राहूल लल्लूराम गुप्ता वय २८ वर्ष रा. शिवशक्ती बिल्डींग, रुम नं ३०४, समेळ पाडा,नालासोपारा पश्चिम

आरोपीत याचेकडे केलेल्या तपासादरम्यान आरोपीतांनी वाहन चोरीचे २ व मोबाईल चोरीचा १ असे ३ गुन्हे केले असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**-: आरोपीत याचे कडुन उघड झालेले गुन्हे :-**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.रजी नं. |
|---|---|---|
| १. | नायगाव पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं ८०/२०२४ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| २. | नालासोपारा पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं ६७/२०२४ भादविस कलम ३७९ प्रमाणे |
| ३. | आचोळे पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं ६०८/२०२३ भादविस कलम ३७९ प्रमाणे |

अटक आरोपीत याचेकडुन उघडकीस आणलेल्या वाहन चोरी व मोबाईल चोरीच्या गुन्हयांमध्ये २ मोटार स्कुटी व १ मोबाईल असा एकुण ५०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**<u>अटक आरोपीची पार्श्वभूमी :-</u>**

तसेच नमुद अटक आरोपीत हे दुखपतीसह जबरी चोरी व वाहन चोरीचे गुन्हयातील गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेले सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरोधात खालीलप्रमाणे गुन्हे नोंद आहेत.

| अ. क्र. | पोलीस स्टेशन | गु. रजि. नं. | कायदा व कलम |
|---|---|---|---|
| १ | तुळींज पोलीस ठाणे | ४४८/२०२३ | भादविस ३७९ प्रमाणे |
| २ | नालासोपारा पोलीस ठाणे | २१७/२०१५ | भादविस ३९४,३४ प्रमाणे |
| ३ | नालासोपारा पोलीस ठाणे | ४२५/२०१३ | भादविस ३७९ प्रमाणे |

सदरची कारवाई मा.श्री अविनाश अंबुरे पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक शाहुराज रणवरे, सपोनिरी/ सुहास कांबळे, सागर प्रकाश शिंदे, सहा.फौज.रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा. रविंद्र पवार, प्रफुल्ल पाटील, चंदन मोरे, सचिन पाटील, दादा आडके, सुधीर नरळे, पो.अं. अमोल कोरे, म.सु.ब.अविनाश चौधरी सर्व नेम- गुन्हे शाखा-२ वसई, यांनी केली आहे.

